ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

July – December 2021- Vol. 10 No. 2

# कीर्तन परंपरेतील स्त्री अभिव्यक्ती

**डॉ. अनघा तेंडुलकर**

*विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक*

*सोफिया महाविद्यालय (स्वायत्त)*

**संक्षेप :-**

*महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या वाटचालीत भक्तिपरंपरांचा सहभाग वाखाणण्याजोगा आहे. मात्र या भक्तिपरंपरांच्या सामाजिक परिवर्तनातील सहभागाबाबत वैज्ञानिक परिप्रेक्ष्यातून अभ्यासाची व्याप्ती तुलनेत मर्यादित राहिली. समाजावर परिणाम करणाऱ्या विविध भक्तिपरंपरांमधील जात-आधारित, धर्म-आधारित, लिंग-आधारित अंतर्प्रवाहांची चाचपणी करून त्यांचा पूर्णार्थाने अभ्यास आवश्यक आहे.*

*ही अध्ययन पत्रिका कीर्तन या भक्तिपरंपरेतील अंतर्प्रवाहांची नोंद घेत कीर्तन परंपरेचा पूर्वेतिहास व मागील आठ शतकांतील उत्क्रांतीचे टप्पे आणि वर्तमानकाळातील या परंपरेचे स्त्री-अभिव्यक्तीच्या दृष्टिकोनातून असलेले महत्त्व याचा उहापोह करते. परिवर्तनाच्या वाटचालीत प्रगल्भ मानल्या गेलेल्या कीर्तन परंपरेतील लिंगभेदाच्या परिप्रेक्ष्यातून हे सादरीकरण केले आहे. कीर्तन परंपरांतील स्त्रियांचा सहभाग, त्यांना दिला गेलेला दर्जा आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य यांची अभ्यासपूर्ण मांडणी येथे केली आहे.*

***महत्त्वाचे कळ शब्द** :–*

*सामाजिक प्रबोधन, कीर्तन, स्त्री-कीर्तनकार*

**प्रस्तावना :-**

कीर्तन परंपरेचे भारतीय लोकसंस्कृतीतील संदर्भ पुराणकालापासून आहे. श्रीमद् भागवतम् अर्थात भागवत पुराणात नवविधा भक्तींचे प्रकार अधोरेखित करून त्याचे विस्ताराने विवरण आहे. नवविधा भक्तीत द्वितीय क्रमांकावर कीर्तन हा भक्तिप्रकार आहे. कीर्तन याचा अर्थ ईश्वराचे कीर्तिस्तवन. या अध्ययन पत्रिकेचा विषय हा कीर्तन परंपरेवर केलेली सामाजिक टिप्पणी हा असून त्या अनुषंगाने कीर्तन परंपरेतील स्त्रियांचा सहभाग व या सहभागाची सामाजिक स्वीकार्हता हा आहे. कीर्तन परंपरेच्या विकासाच्या टप्प्यांचे अध्ययन करताना भागवत पुराणातील नवविधा भक्तिप्रकारांतील इतर भक्ती परंपरांचेही स्त्रियांच्या परिप्रेक्ष्यातून तुलनात्मक आकलन करून घेणे गरजेचे आहे.

**संशोधन पद्धती मीमांसा :-**

ही अध्ययन पत्रिका कीर्तन परंपरेच्या इतिहासाचा धांडोळा घेऊन सद्य परिस्थितीतील कीर्तन परंपरांचा आढावा घेते. यासाठी तीन ठळक उद्दिष्टे आहेत.

1. लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणून कीर्तन परंपरा कशी विकसित होत गेली याचा अभ्यास.
2. स्त्रियांचा कीर्तनातला सहभाग आणि कीर्तन परंपरा अभिव्यक्त करण्यातला सहभाग.
3. सामाजिक परिवर्तनामध्ये कीर्तनाची भूमिका.

तथ्य संकलनाला दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये ऐतिहासिक दृष्टिकोन वापरून दुय्यम स्रोतांच्या मदतीने माहिती संकलित केली गेली. यासाठी मुंबईतील महत्त्वाच्या वाचनालयांना भेटी देण्यात आल्या. यात प्रामुख्याने एशियाटिक वाचनालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांचा सहभाग आहे. प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्यस्रोत वापरून आणि वृत्तपत्रे, मासिके तसेच डिजिटल व्यासपीठांवरील माहितीस्रोत यांच्या आधारे निष्कर्षांची मांडणी केली गेली. सर्व संदर्भ पडताळून पाहण्यात आलेले आहेत. दुसऱ्या टप्प्यात असंरचित मुलाखतीचे तंत्र अवलंबिले गेले. कीर्तनकारांच्या मुलाखती घेऊन आणि पूर्वकालीन मुलाखतींचा अभ्यास करून गृहितके मांडण्यात आली. याला जोड म्हणून देहू-आळंदी, पंढरपूर अशा पीठांना भेटी देऊन निरीक्षणे नोंदवण्यात आली. गुणात्मक संशोधन पद्धती वापरून विदा संकलन करण्यात आले व त्या अनुषंगाने निष्कर्षांची मांडणी करण्यात आली.

**निरीक्षणे आणि निष्कर्ष :-**

महाराष्ट्रातील कीर्तन परंपरेत पौराणिक कालखंडापासून अनेक उपप्रवाह निर्माण झाले. हरदासी तथा नारदीय कीर्तन ही पौराणिक काळापासूनची परंपरा मानली जाते. नारदीय कीर्तन परंपरेचा सवर्णांमधील भक्तिपरंपरा म्हणून लौकिक आहे. वैष्णव कर्मठ व सनातन परंपरांचा नारदीय कीर्तन परंपरांवर वरचष्मा राहिला. नारदीय कीर्तनात नमन पद्धती, श्री गणेश पूजन, पूर्वरंगामध्ये वेदान्त निरुपण व उत्तररंगातील देवादिकांच्या जीवनप्रसंगातील आख्यान या क्रमाने कीर्तन रंगवले जाते. या दरम्यान श्लोक, नमन, ध्यानपद, भजन, जयजयकार, अभंग, तराणा, ओवी, साकी, फटका, आर्या, सुभाषिते, संत-पंत-तंत काव्ये, कटाव, चूर्णिका, दिंडी, न्हाणी, पाळणा या सादरीकरणांचा अंतर्भाव असतो.

गाणपत्य कीर्तन, शाक्त कीर्तन, रामदासी कीर्तन, दासगणु कीर्तन, दत्त संप्रदाय कीर्तन हे नारदीय तथा हरदासी कीर्तन परंपरेचेच प्रवाह आहेत. या कीर्तन पद्धतीचा ढाचा व सादरीकरणातली शिस्तीची मांडणी नेटकी आहे. परंतु

सर्वसमावेशक लवचिकपणा नसल्यामुळे नारदीय कीर्तन पद्धती सामाजिक खुलेपणाच्या बाबतीत मर्यादित राहिली.

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर लोकमान्य टिळकांनी हा लवचिकपणा आणण्याचा प्रयत्न केला. कीर्तनपरंपरेचा उपयोग जाणून जनसामान्यांच्या मनात कीर्तनातून 'केसरी' रुजावा या उद्देशाने 'राष्ट्रीय कीर्तन' ही संकल्पना त्यांच्या पुढाकाराने अस्तित्वात आली. या कीर्तन प्रकारात आधुनिक सामाजिक क्रांतिकारकांचे आख्यान आणि राष्ट्रीय सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने समाज प्रबोधनाची दिशा अंगिकारली गेली. त्यामुळे राष्ट्रीय कीर्तन परंपरेचा तोंडवळा नारदीय परंपरेपेक्षा खुला भासला.

नारदीय कीर्तन परंपरेत गोष्ट अर्थात आख्यान सादरीकरणाला अधिक महत्त्व होते तर त्या तुलनेत वारकरी कीर्तन पद्धतीचा आत्मा हा भजनाचा होता. वारकरी कीर्तन पद्धतीत अभंग सोडवला जातो. संपूर्ण अंभग घेऊन त्याची फोड करून ती सांगीतिक पद्धतीने सादर केली जाते. वारकरी कीर्तनात दाखले वारकरी संतांच्याच अभंगांमधले असतात. टाहो हा वारकरी संगीताचा प्राण. माऊली अर्थात पांडुरंगाच्या नावे टाहो फोडला जातो. हा टाहो बहुजन संगीत परंपरांच्या जवळचा असल्या कारणाने वारकरी कीर्तन परंपरा सर्वसामान्यांमध्ये रुजण्यास व फोफावण्यास मदत झाली. त्यामुळे वारकरी संप्रदाय कीर्तनाचे प्रभावक्षेत्र महाराष्ट्रातून मध्य भारतात सर्वदूर पसरले. वारकरी कीर्तन परंपरेत निरुपण तथा प्रवचन हा भाग गेल्या शतकापासून आला. वारकरी परंपरा फडांनी टिकवून ठेवली. फडांमध्येच नव्या वारकऱ्यांचं शिक्षण होतं. मात्र लोकमान्य टिळकांचे अनुयायी जोग महाराज यांनी वारकरी शिक्षण संस्था उभ्या केल्या. जोग महाराजांवर नारदीय परंपरेचा प्रभाव होता आणि त्यांनी आधुनिक काळातील वारकरी कीर्तन परंपरेला नारदीय कीर्तन परंपरांतील शिस्तबद्धता आणण्याचा प्रयत्न केला.

वारकरी धर्मविचाराला अलिकडच्या काळात संत गाडगे महाराजांनी नव्याने दिशा दिली. पेशवाई कालखंडापासून अस्पृश्यांना विठ्ठल मंदिर परिसरातील प्रवेश निषिद्ध केला गेला होता. अस्पृश्य वारकऱ्यांचा पाठीशी संत गाडगे महाराजांनी मोठी यंत्रणा उभी केली. नगरप्रदक्षिणा मार्गाच्या बाहेर मठ उभारले. अन्नछत्रे सुरू केली. त्यामुळेच गाडगेबाबा आणि त्यांच्या अनुयायांना 'कुसाबाहेरचे महाराज' म्हटलं गेलं. गाडगेबाबांनी मंदिराबाहेरचा वारकरी धर्मविचार पुन्हा जागवला. त्यातून गाडगे महाराज कीर्तन परंपरा रुजली. ती अधिकच खुली झाली. अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा यावर प्रबोधन करणारी ही सर्वात लोकाभिमुख परंपरा ठरली. त्याच दरम्यान कीर्तनकलेत सामाजिक व राजकीय प्रबोधनासाठी चटई कीर्तन (पथकीर्तन) हा प्रकार निर्माण झाला. संत तुकडोजी महाराजांचे खंजिरी भजनासह कीर्तनासारख्या विविध सामाजिक परंपरांचे प्रवाह विकसित झाले. त्या त्या कालखंडात या कीर्तन सादरीकरणाच्या भक्तिपरंपरांनी समाजातील मोठ्या घटकांवर आध्यात्मिक भक्तीचा प्रभाव टाकला व सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य सिद्धीस नेले.

**वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरा**

वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेने बहुजन समाजासाठी प्रबोधनपर लोकचळवळींना पूरक भूमिका घेतली. मध्य भारतातील सामाजिक चळवळींच्या इतिहासामध्ये वारकरी कीर्तन परंपरेने लोकसंवादाचे मोठे साधन म्हणून विकसित होत सामाजिक बंडखोरीला अनुकूलता तयार केली. सामाजिक क्रांतींचा इतिहास लिहिताना बंडखोरीतलं कीर्तन परंपरेचं श्रेय नाकारता येणार नाही.

वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेला सामाजिक आयाम देण्याचं श्रेय संत नामदेवांना आहे. त्यांनी नामसंकीर्तनाचं बीज महाराष्ट्राच्या मातीत रोवलं. भक्तिमार्गातील ही आठ शतकांपूर्वीची मोठीच बंडखोरी होती. नित्यकर्मांच्या सोबतीने नामस्मरणातून ईश्वरभक्ती अर्थात प्रवृत्तीवादी भक्तिभावना रुजवण्याचं काम संत नामदेवांनी मध्य भारतात त्याकाळात केलं. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय हा त्या काळातला मोठाच पुरोगामी विचार होता. पुराण व धर्मशास्त्रांचा तर्कशुद्ध विचार करण्याची पद्धत वारकरी कीर्तन परंपरांनी मांडली. सामाजिक विषमतेविरोधात मांडणी करून डोळस श्रद्धेसह तोडगे प्रस्थापित केले. वारकरी कीर्तन परंपरेमध्ये कीर्तन कुठे व कधी करावे यासाठी नियम नाहीत. कुठल्याही ज्ञातिधर्माला किंवा वर्गाला, वयाला कीर्तन वर्ज्य नाही. नामदेवांनी मंदिरात अडकलेला धर्म वाळवंटात आणून मोकळा केला. चंद्रभागेच्या वाळवंटात सामूहिक कीर्तनाचा पायंडा घातला. त्यामुळे कीर्तन संवादी झालं. 'नामा वाळवंटी कीर्तन करी' असं त्यांचं वर्णन जनाबाईच्या अभंगात आहे. 'संत सोयरियांची व्हावयासी भेटी। म्हणोनी वाळवंटी वस्ती केली॥' मंदिरात प्रवेश नसलेल्या अवर्ण भाविकांच्या अस्पृश्यतेच्या वेदना कमी करण्यासाठी नामदेवांनी सर्वांना वाळवंटात एकत्र केलं.' असा या अभंगामागचा विचार दिनकर शास्त्री भुकेले सांगतात.

*यारे यारे लहान थोर । याति भलते नारीनर ।*
*करावा विचार । न लगे चिंता कवणाची ।*
*सकळांसी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरीच्या नामे ।।*

पुढे संत तुकारामांनी सतराव्या शतकात लिहिलेल्या या अभंगातून वारकरी संप्रदायाचा समतावादी विचार लख्खपणे सामोरा येतो. तुम्ही कुठल्याही जातीचे असा, धर्माचे असा, स्त्री-असा वा पुरुष असा, वयानं किंवा जातीनं लहान असा वा थोर असा, सारे सारे या, असं हे सगळ्यांना सामावून घेणारं

वर्तुळ वारकरी विचाराला अपेक्षित होतं, अशी नोंद इतिहास संशोधक डॉ. सदानंद मोरे करतात.

यज्ञयागाच्या वैदिक परंपरांच्या जोखडातून समाज जे स्वातंत्र्य मिळवू पाहात होता ते वारकरी कीर्तन परंपरेने उपलब्ध करून दिले. कर्म, यज्ञ, दान, तप या वैदिक परंपरांचा त्याग करून कीर्तन ही सोपी, सुटसुटीत व परिणामकारक भक्तिपरंपरा समाजाला भावली. पाप-पुण्याच्या संकल्पनांमध्ये कीर्तनातून मुक्तीचा सोपान व आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग सहजसाध्य होता. मूळ संकल्पनेनुसार कीर्तनात अभिव्यक्तीसाठी किंवा सादरीकरणासाठी शुद्रांना वा स्त्रियांनाही मज्जाव नव्हता. कीर्तन परंपरा ही मुळात प्रवृत्तीवादी होती. निवृत्तीवादाचं आणि वैराग्याचं प्रस्थ असण्याच्या काळात गृहस्थाश्रमात राहून प्रवृत्तीवादी पद्धतीने भक्तिरसाची ओळख करून देताना अर्थातच स्त्रिया यात येणं अपरिहार्य होतं. समाजाच्या प्रवृत्तीवादी अर्थात संसारी संरचनेचा कणाच स्त्री आहे. आठशे वर्षांपूर्वी वारकरी कीर्तन परंपरेत स्त्रियांचाही सहभाग होता. संत नामदेवांनी संत जनाबाईंना कीर्तन परंपरेत घेतलं. कीर्तनात स्त्रियांच्या ज्ञात सहभागाची ही सुरुवात.

'डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी...' असं आठशे वर्षांपूर्वी कर्मठांना सुनावण्याचे धारिष्ट्य संत जनाबाईंकडे होतं. जनाबाई या दासी होत्या. या प्रवर्गातून येऊन संतपदापर्यंत झेप घेतली ही मोठी गोष्ट. संत नामदेवांनी जेव्हा पहिलं कीर्तन चंद्रभागेच्या वाळवंटात केलं, तेव्हा पहिल्या फडकरी संत जनाबाई होत्या.

*नामदेव कीर्तन करी । पुढे देव नाचे पांडुरंग॥*
*जनी म्हणे ज्ञानदेवा बोला अभंग॥*

हा अभंग त्याचे प्रमाण मानला जातो. फडामध्ये अभंग म्हणायला सांगण्याचा अधिकार फडप्रमुखाला असतो. याचा अर्थ जनाबाई फडप्रमुख होत्या. त्यांचा हा अधिकार संत ज्ञानेश्वरांनीही मान्य केला होता. त्या काळातील पंढरपूर मंदिरातील विविध संतांच्या सहभागासह कीर्तनात नियोजन व व्यवस्थापन या बाबतीत एक स्त्री कार्यरत होती ही गोष्टही खूप दिलासा देणारी आहे. काळपरत्वे सर्व वर्णातील तथा बहुजन वर्गातीलही कीर्तनकार विकसित झाले, पण कीर्तन अभिव्यक्तीसाठी वारकरी कीर्तनकार स्त्रियांवर मात्र बंधने येत गेली. वारकरी कीर्तन भक्तिपरंपरेने खुलेपणा आणला तरीही धार्मिक व आध्यात्मिक कोंदणामुळे ही परंपरा विधि व रीती-प्रघातांच्या जाळ्यात अडकली. धर्म व पावित्र्याच्या संकल्पना कीर्तनाला आपसुक चिकटल्या. नेमक्या याच कारणांमुळे कीर्तन परंपरांच्या विकासाच्या पुढील टप्प्यात कीर्तन सादरीकरणापासून स्त्रियांना दूर ठेवण्यास सुरुवात होत गेली. स्त्री-पुरुष समानतेविषयी सर्व संतांनी आपल्या अभंगांमध्ये लिहिलं आहे. मात्र त्याचं आचरण करणं समाजपुरुषाला शक्य झालं नाही. अलिकडील शतकाच्या वाटचालीत कीर्तन परंपरेतील स्त्रियांच्या वावरावर मर्यादा लादण्यात आल्या. सामाजिक परिवर्तनाचा प्रगल्भ वारसा असताना या घटितामागची सामाजिक संरचना समजून घेणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायातील वर्तमानकाळातील या घटिताचा विचार करताना त्याचवेळी नारदीय कीर्तन परंपरेतील आजचे स्त्रियांच्या अभिव्यक्तीची स्थिती लक्षात घेतली पाहिजे. नारदीय कीर्तन परंपरा ही कथित सवर्ण समाजामध्ये लोकप्रिय असल्या कारणाने त्याची व्याप्ती कमी असली तरी आधुनिक काळात यातील स्त्रियांचा सहभाग सहज स्वीकारला गेला. हरदासी तथा नारदीय कीर्तन करणाऱ्या स्त्रिया या बहुतांश बुवांच्या मुली किंवा बहिणी असल्या आणि त्यांनी घरातूनच कीर्तनाची दीक्षा घेतलेली असल्यामुळे त्यांचा वावर तुलनेत बंधमुक्त वाटतो.

पण लिंगभेदाच्या परिप्रेक्ष्यातून त्याला खुलेपणाचे प्रशस्तीपत्र देणे योग्य होईलच असे नाही. कारण नारदीय कीर्तन परंपरा वारकरी कीर्तन परंपरेतील तत्वबोध टाळताना दिसते. समानतेचा तोंडवळा स्वीकारला तरी मांडणीत हातचे राखून सांगितले जाते असा आक्षेप घेतला जातो. रामदासी कीर्तन परंपरा आणि वारकरी कीर्तन परंपरा अंतर ठेवून वाटचाल करताना दिसतात. महाराष्ट्रातील कीर्तन परंपरांमधले हे अंतर्प्रवाह लक्षात घेता तुलनेत गाडगेबाबा कीर्तन परंपरेत मात्र अनेक महिला कीर्तनकार पुढे आल्याचे आणि त्यांना या परंपरेने खुलेपणाने स्वीकारल्याचे दिसते. वर्तमान काळात वारकरी फडांतील महिलांना मंदिरात कीर्तन-प्रवचन करण्यास परंपरेने दिलेले अधिकार नाकारण्याच्या घटना घडत आहेत असे निरीक्षण रिंगण या २०१५ सालच्या वार्षिक अंकात पत्रकार हर्षदा परब यांनी नोंदवले आहे. त्या सांगतात, आजही अनेक फडांवर महिलांनी कीर्तन करण्याची पद्धत नाही. महिलांना टाळ घेऊनही कीर्तनात उभे राहता येत नाही. अनेक व्यासपीठांवर, नामसप्ताहात महिला कीर्तनकाराचे नाव असेल तर ज्येष्ठ ह.भ.प. महाराजांकडून कडाडून विरोध होतो. स्त्रियांच्या भारुड आणि कीर्तनास मान्यता नाही. दिंडीचं नेतृत्व करण्यासही स्त्रियांना विरोध केला जातो.

ह.भ.प. बाबामहाराज सातारकर यांच्या कन्या भगवतीताई दांडेकर-सातारकर या दीडशे वर्षांची उदार परंपरा असलेल्या सातारकर फडाची जबाबदारी सांभाळतात. वडिलांच्या छोट्या अपघाताचं निमित्त झाल्याने भगवतीताई फडावर कीर्तनासाठी उभ्या राहिल्या. वडिलांचा वारसा असूनही महिला कीर्तनकार म्हणून त्यांना सुरुवातीला जाहीर विरोध झाला. 'सातारकर फडात महिला टाळ घेऊन नाचतात', अशी कुत्सित टीका केली गेली. गोदावरीताई मुंडे यांचा गेली ३० वर्षे अभंगगायिका म्हणून लौकिक आहे. वारीच्या वाटेवर वाखरीमधल्या एका

कीर्तनात गोदावरीताईंना अभंग म्हणण्याचा आग्रह झाला. पण महिलांना कीर्तनात 'चाल धरण्याचा अधिकार नाही', असं सांगून ज्येष्ठ पुरुष कीर्तनकार महाराजांकरवी त्यांना खाली बसविण्यात आलं.

संगीतविशारद असलेल्या भीमाताई लोंढे गेली ३५ वर्षे अनेक संतांवर कीर्तन करतात. त्यांचे निरीक्षण आहे की, कीर्तनाला कुणी महाराज आले नाहीत तरच महिला कीर्तनकाराला संधी दिली जाते. कीर्तनाचं मानधन देतानाही भेद केला जातो. महिला कीर्तनकारांच्या तुलनेत पुरुष कीर्तनकारांना अधिक मानधन दिलं जातं. बऱ्याचदा वाद नको म्हणून अनेक ज्येष्ठ कीर्तनकार महिला अधिकारांविषयी फार आग्रही नसतात.

पाचशेंहून अधिक कीर्तने सादर करणाऱ्या बीडच्या यमुनाबाई शिंदे सांगतात की, पुरुष कीर्तनकारांच्या सांगण्यानुसार व सोयीनुसारच कीर्तन करावं लागतं. शेवटी पुरुष वारकऱ्यांच्या सहकार्यानंच परमार्थ करायचा आहे. त्यामुळं त्यांच्याशी जुळवून घेणं भाग पडतं.

जिथं पुरुष कीर्तन करतात तिथं महिला कीर्तन करू शकत नाहीत. पंढरपूरचे श्रीविठ्ठल मंदिर, आळंदी देवस्थान व देहू येथील मंदिरातील वीणा मंडप इथे महिलांना कीर्तन करण्यास विरोध आहे. देहू येथील भंडारा डोंगरावर महिलांना कीर्तन, प्रवचन करण्यास बंदीच आहे. महिलांना कीर्तन करण्याची मुभा दिली जाते, ती महिलांसाठीच्या वेगळ्या हरिनाम सप्ताहात! त्यासाठी वेगळी जागा दिली जाते. आळंदीत देवाच्या समोर नाही तर देवळाच्या डाव्या, उजव्या भागात महिला कीर्तन करू शकतात.

ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांच्या शब्दाला वारकऱ्यांमध्ये मोठा मान आहे. वारकऱ्यांच्या प्रश्नी ते नेतृत्वही करतात. त्यांच्या मते 'वारकरी संप्रदायामध्ये महिला कीर्तनकारांना संमती नाही. संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई, संत जनाबाई या कीर्तन करत होत्या, असे कुठेही दाखले नाहीत. महिलांची कीर्तनाची परंपराच नसल्यानं देहू, आळंदीच्या वगैरे वीणामंडपात महिलांना कीर्तनाची परवानगी देण्याची पद्धत नाही.'

माणसातच भेदभाव करणाऱ्या सनातन प्रवृत्तीला विरोध म्हणून वारकरी संप्रदायाने कीर्तन परंपरा रुजवली. महिला संतांच्या सहभागाने ही परंपरा सर्वसमावेशक झाली. काळानुरूप ती अधिक व्यापक होण्याऐवजी संकुचित होत आहे. धार्मिक पुनरुज्जीवनाचे वारे वाहू लागले की आध्यात्मिक अधिष्ठान असलेल्या कीर्तनासारख्या भक्तिपरंपरेला पावित्र्याच्या संकल्पना जोडल्या जाऊ लागतात. अशा वातावरणात आध्यात्मिकतेत प्रगल्भ उंची गाठलेल्या कीर्तनासारख्या भक्तिपरंपरेतही पावित्र्यभंगाचा आक्षेप सर्वप्रथम स्त्रियांवरच घेतला जातो. साहजिकच कीर्तनातून अभिव्यक्त होणाऱ्या महिलांना त्याचा पहिला व थेट फटका बसतो. सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीत लोकप्रबोधनाचे एक प्रगल्भ व परिणामकारक साधन म्हणून कीर्तन भक्तिपरंपरा विकसित झाली तरी सुप्तपणे अस्तित्वात असलेले अंतर्विरोध स्त्रियांच्या अनुषंगाने आजही एक आव्हानात्मक परिस्थिती म्हणूनच दिसून येतात. सामाजिक क्षेत्रातील हे बदलही घडवून आणायचे असतील तर त्यासाठी नव्याने सामाजिक प्रबोधनाची आणि लोकजागराची भूमिका घ्यावी लागेल.

**टिप :-**

(ही अध्ययन पत्रिका आय.सी.एस.एस.आर. मेजर रिसर्च प्रोजेक्टच्या अंतर्गत संशोधनातील एक भाग आहे.)

**संदर्भ :-**

1. *रिंगण, संत जनाबाई आषाढी विशेषांक, २०१५*
2. *नारदीय आणि वारकरी कीर्तन पद्धती पुस्तिका, कीर्तन पदविका अभ्यासक्रम, भारती विद्यापीठ*
3. *ढेरे, रामचंद्र चिं., संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९७८*
4. *दांडेकर, शं. वा. (संपा.) वारकरी पंथाचा इतिहास., दुसरी आवृत्ती, पुणे*
5. *प्रा. दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, १९५७*
6. *पाठक, यशवंत, नाचू कीर्तनाचे रंगी : मराठी कीर्तन संस्थेचा चिकित्सक अभ्यास. पुणे. कॉन्टिनेन्टल प्रकाशन.*
7. *पाठक, यशवंत, कीर्तन परंपरा एक लोकसाहित्याविष्कार, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी,पुणे,२००८.*
8. *बंडगर, ज्ञानेश्वर, देवाचिए द्वारी, स्तंभलेखांक २४, दैनिक पुण्यनगरी, २०२०*